# महाराष्ट्र शासन
# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
# राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा रुग्णालय आवार गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५, website www.jeevandayee.gov.in

## जाहिरात

राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयातील क्षेत्रीय स्तरावरील ऑपरेशन्स बाबी हाताळण्यासाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नामिकासूची तयार करण्यात येत आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी हे महाव्यवस्थापक (ऑपरेशन्स) या कंत्राटी तत्त्वावरील पदासाठी नामिकासूची तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे अर्हताधारक व अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागवित आहेत.

**पदनिहाय आवश्यक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा:**

| No. | Name of the Post | Qualification | Less than | Experience | No. of Post | Salary |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | General Manager (Operations) | A) MBBS & PG in any branch of Medicine or Equivalent and registered with concerned medical council.<br>B) Preference will be given to person with experience in Insurance based services and hospital. | 65 years. | A) Equivalent to rank of Director/Addl.Director/ Joint Director/Dy. Director (Health Services) with more than 20 years of Service Experience in Maharashtra Govt. Group 'A'<br>B) Drawing salary in Pay Band 37400-67000 Grade pay Rs.8900/-or Rs.8700/- & Pay Band Rs.15600-39100 Grade Pay Rs.7900/- or Rs.7600/- as per 6th pay commission at the time of retirement. | 01 | Remuneration as per General Administration Dept. GR dated 17.12.2016 |

**सर्वसाधारण अटी व शर्ती:**

१) सदर विवक्षित कामांसाठी नियुक्ती कंत्राटी पध्दतीने ०१ वर्षासाठी राहील. करार कालावधीत सेवा समाधानकारक असल्यास पुढील कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

२) नियुक्तीसाठी पात्र उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवाराने त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र रुजू होतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसणे किंवा अशा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसणे आवश्यक आहे.

४) निवड होणाऱ्या शासकीय सेवानिवृत्त उमेदवारास सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१७ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

५) नियुक्तीचे ठिकाण वरळी, मुंबई येथे राहील.

६) प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल.

७) अर्जदार हा मुंबई किंवा मुंबई लगतच्या परिसरातील रहिवासी असावा.

इच्छुक उमेदवारांनी ao02@jeevandayee.gov.in या ईमेलवर आपल्या बायोडेटासह अर्ज सादर करावा. तसेच वैयक्तिक/पोस्टाने अर्ज पाठवावयाचा असल्यास राज्य आरोग्य हमी सोसायटी, जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, गणपत जाधव मार्ग, वरळी नाका, वरळी - मुंबई ४०० ०१८ या पत्यावर अर्ज सादर करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम दि.०९.०६.२०२३ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील.

उपरोक्त जाहिरातीनुसार प्राप्त अर्ज नाकारण्याचा अथवा जाहिरात रद्द करण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याकडे राखीव ठेवण्यात आला आहे.

दि.२५.०५.२०२३
ठिकाण: वरळी, मुंबई-१८

(विनोद बोंदरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी